UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# || संशोधक ||

### पुरवणी अंक ४ – मार्च २०२४ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणी अंक : ४

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्राचार्य डॉ. आर. एस. मोरे ● प्रो. डॉ. ए. के. वावरे ● डॉ. ए. व्ही. पोरे

* प्रकाशक *

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका

१. महाराष्ट्रातील नैसर्गिक वारसा स्थळ – कास पठार

- डॉ. गावित राजेश शिवाजी, डॉ. वाईकर मृणालिनी सचिन ---------- ७

२. शेतीमधील पीकपद्धती व पूरक व्यवसायावर कोविडचा झालेला परिणाम

- प्रा.डॉ.सदाशिव राजाराम बनकर, प्रा.डॉ.उध्दव मनोहर घोडके ---------- ११

३. तुळजापूर तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याचे आर्थिक विश्लेषण

- प्रा. डॉ. अशोक भीमराव भोंग ---------- १४

४. ग्रामीण विकासापुढील आव्हानांचे वास्तव

- प्रा. नवनाथ नाथाराव इप्पर ---------- १७

५. डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांचे कृषी क्षेत्रातील इनोवेशन्स

- डॉ.आत्माराम बाबुराव मुळीक ---------- २४

६. भारतीय अर्थव्यवस्था: स्त्री उद्योजकतेची भूमिका, समस्या आणि उपाययोजना

- डॉ. ए. एस. नलवडे ---------- २८

७. माण देशी महिला सहकारी बँकेच्या ठेवी व कर्जवाटपामुळे महिला उद्योजकतेचा झालेला विकास

- सौ.मनिषा सुरेश पवार ---------- ३२

८. किमान आधारभूत किंमतीचा कृषी उत्पादनावर प्रभाव

- श्री. निलेशकुमार गुरव ---------- ३७

९. आभासी चलन :– नव्या संधी आणि भविष्यातील दिशा

- प्रा. किशोर गजानन सुतार ---------- ४४

१०. हार्ड कांन्सी ते क्रिप्टो करंन्सी : मागोवा करन्सीच्या विकासाचा

- श्री. मारुती बाबुराव राठोड ---------- ५३

११. 'शाश्वत शेतीसाठी संशोधन व समग्र विकासाची आवश्यकता'

- डॉ. शेडगे डी. बी. ---------- ५९

१२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन प्राध्यापकांचा नाविण्यपूर्ण अध्यापन पध्दतीविषयक दृष्टीकोन : एक अभ्यास

- श्रीमती नांगरे नूतन कृष्णराव, प्राचार्य डॉ.बालाजी जी.गिरगावकर ---------- ६५

१३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षकांची बदलती भूमिका
- डॉ. अशोक सटवा माहुरे ---------- ६८

१४. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संधी आणि आव्हाने
- डॉ.वर्षा माने ---------- ७२

१५. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२०: एक विश्लेषण
- डॉ. राजश्री जे. जावळे ---------- ७७

१६. शिक्षण ४.० मधील आधुनिक तंत्रज्ञान
- प्रा. डॉ. आनंद ज्ञानेश्वर शिंदे ---------- ८०

१७. आनंदी जीवनासाठीचे शिक्षण
- डॉ. शिंदे भागवत आसाराम ---------- ८६

१८. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ व शिक्षका पुढील आव्हाने
- डॉ. अंकुश जाधव ---------- ९०

१९. निरक्षरता व दारिद्र्य आणि लोकसंख्या वाढ: एक भौगोलिक अभ्यास
- प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर ---------- ९८

२०. शेती क्षेत्रासमोरील आव्हाने, समस्या व उपाययोजना
- डॉ. लोंढे सी.बी. ---------- १०६

२१. बाळकृष्ण आनंदराव पाटील यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान
- प्रा. आकाश राजाराम चव्हाण, डॉ. राजेंद्र भिमाजी सातपुते ---------- १०९

२२. प्राचीन महाराष्ट्रातील व्यापारपूरक उद्योग व व्यवसाय (इ.स.पू. ६०० ते इ.स.३००)
- सारंग धारपुरे, कुबेर कट्टीमणी ---------- ११३

२३. पुरातत्वीय संशोधनातील नवीन दिशा
- प्रा सुषमा विलासराव जाधव, प्रा सूर्यकांत अनुरथ गिरी ---------- ११८

२४. क्वारंटाईन व्यवस्था राजर्षी छ. शाहू महाराजांच्या व्यवस्थापनाचा एक आदर्श नमुना
- रणजित रंगराव पाटील, प्रा. डॉ. बबन भिवसेन जाधव ---------- १२१

२५. भारतीय नाण्यांची ओळख व गुप्तकालीन नाणी
- डॉ.सोनावले राजेंद्र रघुनाथ, प्रा.कुंभार भाग्यश्री शामराव ---------- १२५

२६. छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती
- वसुदेव प्रभु मुळीक, डॉ. यू.ए. साळुंखे ---------- १२९

ISSN No. 2394-5990

# भारतीय नाण्यांची ओळख व गुप्तकालीन नाणी

**डॉ.सोनावले राजेंद्र रघुनाथ**
इतिहास विभाग प्रमुख
डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर(बुर्ली)
ता. पलूस.जि. सांगली.(मोबा.९१४५६४६१२५)

**प्रा.कुंभार भाग्यश्री शामराव**
डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर(बुर्ली)
ता. पलूस.जि. सांगली. (मोबा.७७५६९९६२५२)

**प्रस्तावना:**

नाण्यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नाणकशास्त्र होय. अशा अभ्यासामध्ये नाणी ज्या धातूंनी बनलेली आहेत, तो धातू ओळखणे त्यापासून त्यांचा अभ्यास करून त्यांचे वर्गीकरण करणे अशा बाबींचा समावेश होतो. या शास्त्राचा सखोल अभ्यास मइंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ न्यूमिसमॅटिक रिसर्च सोसायटीफ या अंजनेरी(नाशिक) स्थित संस्थेमध्ये केला जातो. वा. सी. बेंद्रे म्हणतात, मनाण्यांचा ऐतिहासिक साधन या दृष्टीने बराच उपयोग होतो. नाणी ही एक प्रकारच्या अविनाशी ऐतिहासिक साधनांपैकी एक आहेत.फमानवी समूहात वस्तुविनिमय संपून विनिमयासाठी व्यवहारात नाण्यांचा उपयोग सुरु झाला तेव्हा पासूनची नाणी अभ्यासासाठी उपयुक्त ठरतात. प्राचीन व मध्ययुगीन काळातील अनेक राज्यकर्त्यांची विविध भूप्रदेशांवरील नाणी आपणास विविध ठिकाणाहून प्राप्त होतात. ही नाणी सोने, चांदी किंवा मिश्र धातूंची आहेत. नाण्यांमुळे राजे, त्यांची नावे, घराणी, त्या घराण्यांचा किंवा राजांचा कालखंड, त्यांनी कोणत्या प्रदेशावर राज्य केले तो भूप्रदेश इ.ची माहिती मिळते. भारतात ग्रीस व रोमनची नाणी मिळाली त्यावरून प्राचीन काळात त्या देशांशी व्यापार सुरु होता हे स्पष्ट होते. तसेच नाण्याचा धातू, त्याचा आकार व सुबकता यावरून देशाची आर्थिक स्थिती, भौतिक प्रगती इ.वर प्रकाश पडतो. नाण्यांवर जे विविध शिक्के, चित्रे असतात त्यावरून त्या काळाच्या धार्मिक व सामाजिक परिस्थितीचे ज्ञान काही प्रमाणात आपणास कळते.

**नाण्यांचा उगम :**

सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी मानवी जीवनाला स्थैर्य लाभल्याने ते समृद्ध होऊ लागले. यातून कालक्रमाने स्वयंपूर्ण खेड्यांचे छोट्या राज्यांत रूपांतर होऊन कालांतराने साम्राज्ये अस्तित्वात आली. एकमेकांत देवाणघेवाण वाढू लागली. या प्रकारची देवाणघेवाण अश्मयुगातही अस्तित्वात असावी. एकमेकाला हव्या असलेल्या वस्तूंची अदलाबदल होत असावी. ही पद्धत नवाश्मयुगात आणि ताम्रपाषाणयुगातही चालू राहिली. पुढे खेड्यांची वाढ होऊन नागरी संस्कृतीचा उदय झाला आणि त्यामुळे मानवी गरजा वाढल्या. कालांतराने कुंभार, सुतार, लोहार इ. कारागिरांचे वर्ग अस्तित्वात आले. या कारागिरांचा सारा वेळ इतरांना लागणाऱ्या वस्तू तयार करण्यात जाऊ लागला. त्यामुळे त्यांना स्वतःचे धान्य पिकवणे किंवा वस्त्र विणणे अशक्य झाले परंतु तयार केलेल्या वस्तूंच्या बदल्यात त्यांना आपल्या गरजा भागविण्यासाठी वस्तू मिळू लागल्या. सुरुवातीस अदलाबदलीच्या वस्तूंचे मूल्य ठरविणे अवघड झाले असावे. पुढे अदलाबदलीसाठी पशुधनाचाही मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला. ताम्रपाषाणयुगात वस्तूंच्या बदलात तांबे देण्यास सुरुवात झाली. गाईच्या किंवा बैलाच्या चामड्याच्या आकाराचा तुकडा प्राचीन क्रीटमध्ये देत. ईजिप्तमध्ये वस्तूंच्या खरेदीसाठी तांब्याच्या, चांदीच्या किंवा सोन्याच्या अंगठ्या वापरीत. बॅबिलोनियन लोक अंगठी ऐवजी ठराविक वजनाचे धातूचे गोळे वापरीत. प्राचीन काळामध्ये याच प्रकारचे चांदीचे लंबगोलाकृती तुकडे वापरीत. धातूंचे हे तुकडे, त्यांचे वजन आणि शुद्धता दर वेळी तपासणे कटकटीचे काम होते. व्यापाऱ्यांना तर ते विशेष जाणवे. त्याऐवजी प्रत्येक तुकड्यावर त्याच्या वजनाची आणि शुद्धतेची हमी देऊन एखादी खूण किंवा चिन्ह केल्यास इतरांना दर वेळी ते तपासून घेण्याची जरूर राहणार नाही, असे त्या काळी व्यापाऱ्यांना साहजिकच वाटले. त्यामुळे अशा तऱ्हेची खूण किंवा चिन्ह कोरण्याचे काम प्रतिष्ठित व्यापाऱ्यांनी अंगावर घेतले. यातूनच पुढे चलनी नाण्यांचा जन्म झाला. सर्वप्रथम लिडियामध्ये धातूच्या तुकड्याला त्याच्या वजनाची व शुद्धतेची हमी म्हणून चिन्हे उमटविणे चालू झाले.[1]

नाण्यांच्या उगमासंबंधी प्रो. एम. के. ढवळीकर म्हणतात, मप्राचीन काळात खेडी, साम्राज्ये व मानवही स्वयंपूर्ण होत गेला. नागरी संस्कृतीचा उदय झाला. वस्तूंची अदलाबदल करण्याची पद्धत व्यवहारामध्ये अस्तित्वात आली. या अदलाबदल पद्धतीमध्ये दोष असा होता कि वस्तूचे मूल्य ठरावीक नसे. हत्याराला लागणाऱ्या दगडाच्या मोबदल्यात किती गेरू द्यावा किंवा दहा मडकी कुंभाराकडून हवी असल्यास किती धान्य द्यावे याचे मोजमाप अस्तित्वात नव्हते. यामुळे व्यवहारांत अडचणी निर्माण होत असत. भारतीय, इजिप्त,

बॅबिलोनियन व इतर संस्कृतीमध्ये वस्तूच्या खरेदीचे दर वेगवेगळे व माध्यमे वेगळी असत. व्यापाऱ्यांना विशेषतः याचा त्रास होत असे. अशा अडचणींवर मात करण्यासाठी चांदी, सोने या धातूंच्या शुद्धतेनुसार त्यांचा व्यवहारात वापर करण्याची पद्धत सुरु झाली. यामधूनच प्रत्येक तुकड्यावर त्याच्या वजनाची आणि शुद्धतेची हमी म्हणून एखादे चिन्ह किंवा खूण करण्याची कल्पना अस्तित्वात आली. यामधूनच चलनी नाण्याचा जन्म झाला.[३]

'Through it become a wel established custom to settle bargains by transper of metal of a particular weight and shape some inhernt difficults were still there.'[४]

**नाण्यांचा विकास :**

नाण्यांच्या विकासामध्ये अगदी सुरुवातीला इ. स. पू. ६ शतकामध्ये 'आहत' नाणी असत. यामध्ये प्रत्येक चिन्हासाठी एक स्वतंत्र 'पंच' असे. मग चांदीच्या पत्र्यावर वेगवेगळे पंच वापरून वेगवेगळी चिन्ह उमटवली जात याला 'आहत नाणी' punch marked coins (PMC) असे म्हणतात. त्यानंतर कास्ट किंवा साच्यातील नाणी येऊ लागली. यामध्ये, मातीच्या थाळ्यांची एक झपरतफ केली जात असे. यातील प्रत्येक थाळीमध्ये तीन- चार नाण्यांचे पोकळ साचे असतात. या सर्व थाळ्या एका मातीच्या पाईपने जोडलेल्या असत. हे सर्व मातीने बंद केले जाई. मग, पाईपच्या तोंडामधून धातूचा तप्त रस ओतला जाई. तो त्या परतीतील प्रत्येक थाळ्या भरत. अशा तऱ्हेने सर्व थाळ्या म्हणजे साचे भरले की ती परत थंड केली जाई. मग शेवटी ही परत फोडली जात असे. मग नाणी तयार होत असत.

यानंतर, 'डाय स्ट्रक' हे तंत्रज्ञान आले. याचे मूळ तत्व हे पूर्वीच्या आहत नाण्यांसारखेच असे. फक्त याठिकाणी विविध चिन्हांसाठी एकच 'चिन्हांकित पंच' असे. मग एका ऐरणीवर खालच्या बाजूने वर तोंड करून एक पंच ठेवला जाई. त्यावर कोरे नाणे ठेवत. मग त्या कोऱ्या नाण्यावर मागील बाजूला दुसरा चिन्हांकित पंच ठेवला जाई. मग हाथोडी या दुसऱ्या पंच च्या मागे मारला जाई. त्यामुळे नाण्यांच्या दोन्ही बाजूला एकाच आघातामध्ये त्या पंच वरील सर्व चिन्हे उमटत असत. आजही नाणी अशाच 'डाय स्ट्रक' पद्धतीने पाडली जातात.[५]

**गुप्तकालीन नाणी :**

इ.स.च्या चौथ्या शतकातील गुप्त साम्राज्य हे प्राचीन भारतातील सुवर्णयुग समजले जाते. कर्तृत्ववान राजांची अखंडित मालिका, प्रचंड साम्राज्य विस्तार, उत्तम प्रशासन, संपन्न शेती, वैविध्यपूर्ण कारागिरी, समृद्ध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्यापार, बृहद भारताची निर्मिती, साहित्य विज्ञान, कला-स्थापत्य यामधील अभिजात निर्मिती ही या काळाची प्रधान वैशिष्ट्ये होती. 'प्रत्येक गोष्टीचा सर्वोच्च मापदंड या काळात निर्माण झाला. या काळामध्ये सोन्याची अप्रतिम नाणी गुप्तांनी पाडलेली दिसून येतात. आकार, रेखाटन, आकृती, चिन्ह, लेखन, भाषा अशा सर्वच निकषांवर ही नाणी अत्युत्तम अशी दिसून येतात. तशीच ही सोन्याची नाणी कमालीची शुध्द आहेत. यावरून या काळाची आर्थिक संपन्नताही आपल्याला लक्षात येते. गुप्तांची नाणी मोठ्या प्रमाणावर जी सापडतात ती सोन्याची आहेत. बहुतेक नाणी गोलाकारच आहेत. यावरील लेख मकोरडेफ न येता वृत्तांमध्ये येऊ लागले. यांची भाषा संस्कृत असून, लिपी ब्राह्मी आहे. आपल्याला हे माहित आहे की कुषानांची सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणावर पाडली. मात्र नाणे तयार करण्यासाठी त्यामध्ये जो इतर धातू मिसळला जातो तो कुषान नाण्यांमध्ये ५०% आहे. मात्र गुप्ताच्या काळात समृध्दीही अधिक होती, शिवाय तंत्रज्ञानही अधिक विकसित होते. त्यामुळे गुप्त नाण्यांमध्ये मिसळ १०% दिसून येते?

भारतीय नाण्यांमध्ये गुप्त राजांची नाणी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर इ. स. तिसर्या शतकाच्या उत्तरार्धात प्राचीन भारताचा बहुतांश भूभाग गुप्त राजवंशाच्या आधिपत्याखाली आला. गुप्त राजवंशाने इ. स. तिसर्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते इ. स. सहाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत प्राचीन भारताच्या बहुतांश भूभागावर राज्य केले. या राजवंशाने प्रचलनात आणलेल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण नाण्यांचे प्राचीन भारताच्या राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रारंभिक गुप्त नाण्यांवर कुषाण नाण्यांचा प्रथम दर्शनी प्रभाव दिसत असला, तरी कालांतराने गुप्त सम्राटांनी विविध बदल घडवून स्वतंत्र धाटणीची नाणी प्रचलनात आणली. ही नाणी सोने, चांदी, तांबे आणि शिसे या धातूंची असून नाण्यांवरील बिरुदे आणि लेखांसाठी ब्राह्मी लिपी आणि संस्कृत भाषेचा वापर केलेला आहे. गुप्तकालीन अभिलेखात सुवर्ण नाण्यांसाठी इदिनारफ या संज्ञेचा प्रयोग केलेला आहे. नाणी बनविण्यासाठी ठसा पद्धत वापरली जात होती.

**प्रथम चंद्रगुप्ताची नाणी :**

प्रथम चंद्रगुप्ताची केवळ सुवर्ण नाणी उपलब्ध आहेत. प्रथम चंद्रगुप्त हा गुप्त साम्राज्याचा वास्तविक संस्थापक. याने आपले राज्य स्थिर ठेवण्यासाठी शेजारील लिच्छवी राजघराण्याशी वैवाहिक संबंध निर्माण केलेले होते. त्यामुळे याची नाणी संयुक्त

ISSN No. 2394-5990

दिसतात म्हणजे राजा आणि राणी दोघेही दिसतात. तर मागे 'लीछ्यवियः' अशी अक्षरे दिसून येतात.

**समुद्रगुप्ताची नाणी :**

समुद्रगुप्ताने केवळ सुवर्ण नाणी प्रचलनात आणली असून या सुवर्ण नाण्यांचे सहा प्रकारामध्ये वर्गीकरण करता येते.

१. राजदंड छाप- यामध्ये पुढील बाजूस राजा हातात राजदंड घेऊन असतो. याच्या समोर एक गरुड ध्वज असतो. नाण्यांचा हा प्रकार मोठ्या प्रमाणावर आढळतो. याचे वजन १०५ -१२२ ग्रेन इतके आहे.

२. धनुर्धर छाप- राजाच्या हातात, राजदंडा ऐवजी धनुष्यबाण येते.

३. परशू छाप- याठिकाणी राजाच्या हातात कुऱ्हाड दिसते. मागील बाजूस कमळावर बसलेली किंवा हातात कमळ घेतलेली लक्ष्मी आहे. 'कृतांतपरशू' हा लेख दिसून येतो.

४. अश्वमेध छाप- याठिकाणी घोडा दिसून येतो. त्याच्यासमोर यज्ञावेदी असते. मागे मअश्वमेध पराक्रमःफ हा लेख दिसून येतो. समुद्रगुप्ताच्या अश्वमेध यज्ञाच्या वेळी ही नाणी पाडलेली होती. यांचे वजन ११५-११८ ग्रेन आहे.

५. व्याघ्र पराक्रम छाप- बाणाने वाघ मारणारा राजा दिसतो. लेख 'व्याघ्रपराक्रमः' असा आहे. तर मागील बाजूस लेख 'राजा समुद्रगुप्तः' असा आहे. वजन १९५ ग्रेन आहे.

६. वीणावादक छाप- हे दुर्मिळ नाणे आहे. यावर समुद्रगुप्त वीणा वाजवत बसलेला दिसून येतो

**रामगुप्ताची नाणी :**

रामगुप्ताचे नाव साधरणतः गुप्त वंशावळीत आढळून येत नसले, तरी अभिलेखीय आणि नाणकशास्त्रीय पुराव्यांच्या आधारे, रामगुप्त या राजाने अल्पावधीसाठी गुप्त साम्राज्याची सूत्रे हाती घेतली होती, असे अभ्यासक मानतात. रामगुप्ताची केवळ ताम्र नाणी उपलब्ध असून ही नाणी प्रामुख्याने मध्यप्रदेशातील माळवा प्रांतातील विदिशा परिसरात प्राप्त होतात. या राजाची सहा प्रकारची ताम्र नाणी - गरुड छाप, कलश छाप, चक्र छाप, देवी छाप आणि अश्वमेध छाप - उपलब्ध आहेत.

**द्वितीय चंद्रगुप्ताची नाणी :**

द्वितीय चंद्रगुप्ताने चार वेगवेगळ्या धातूंत - सुवर्ण, चांदी (रजत), ताम्र आणि शिसे - नाणी काढली. अनंत सदाशिव अळतेकर यांच्या मते, द्वितीय चंद्रगुप्ताने प्रचलनात आणलेल्या सुवर्ण नाण्यात धनुर्धर छाप, सिंह-विक्रम छाप, घाडेस्वार छाप, छत्र छाप, मंच छाप, मंचावर आसनस्थ राजा आणि राणी छाप, राजदंड छाप आणि चक्रविक्रम छाप यांचा समावेश होतो. तसेच ताम्र नाण्यांत शीर्ष छाप, उभा राजा छाप, चक्र छाप, कलश छाप, छत्र छाप आणि गरुड छाप यांचा समावेश होतो. द्वितीय चंद्रगुप्ताने प्रचलनात आणलेली चांदी आणि शिसे यांची नाणी प्रामुख्याने सौराष्ट्र, कच्छ आणि माळवा प्रदेशामध्ये प्राप्त होतात. रजत नाणी पश्चिमी क्षत्रपांच्या रजत नाण्यांचा विलक्षण प्रभाव दर्शवितात. या नाण्यांच्या दर्शनी भागावर राजाचे शीर्ष आणि मागील बाजूस गरुड व राजाचे नाव अंकित आहे. काही नाण्यांवर शक किंवा गुप्त संवत्सरातील वर्ष नमूद केलेले दिसून येते. शिशाच्या नाण्यांत राजदंड छाप, पुष्प छाप, वृषभ छाप, गरुड-श्री विक्रम छाप आणि गरुडासहित तीन कमानयुक्त पर्वत छाप यांचा समावेश होतो.

**प्रथम कुमारगुप्ताची नाणी :**

प्रथम कुमारगुप्ताने द्वितीय चंद्रगुप्त प्रमाणे सुवर्ण, चांदी, शिसे आणि ताम्र नाणी काढली. त्याने प्रचलित आणलेल्या चौदा प्रकारच्या सुवर्ण नाण्यांत धनुर्धर छाप, घोडेस्वार छाप, खड्गधारी छाप, सिंहमहेंद्र छाप, व्याघ्रबलपराक्रम छाप, महेंद्रगज छाप, सिंहनिहंता महेंद्रगज छाप, महेंद्रखड्ग छाप, अश्वमेध छाप, कार्तिकेय छाप, छत्र छाप, अप्रतिघ छाप, वीणावादक छाप आणि राजा-राणी छाप यांचा समावेश होतो. रजत नाण्यांमध्ये गरुड छाप, मोर (मध्यदेश) छाप आणि त्रिशूळ छाप तसेच ताम्र नाण्यात छत्र छाप, गरुड छाप, घोडेस्वार छाप आणि डावीकडे उभा राजा छाप यांचा समावेश होतो. शिशाच्या नाण्यांत वृषभ छाप, चक्र छाप आणि गरुड छाप यांचा समावेश होतो. अभ्यासकांच्या मते रेपुझे (repose) तंत्राने काढलेली सुवर्ण नाणी ज्यावर 'महेंद्रादित्य' हे बिरुद आढळून येते, ती नाणी प्रथम कुमारगुप्ताने प्रचलनात आणली असावीत. तसेच घटोत्कचगुप्तानेही धनुर्धर छाप या प्रकारचे सुवर्ण नाणे काढलेले आहे.

**स्कंदगुप्ताची नाणी:**

स्कंदगुप्ताने सुवर्ण, रजत आणि शिसे या तीन धातूंत नाणी काढली. सुवर्ण नाण्यांत धनुर्धर छाप, राजा व लक्ष्मी छाप, छत्र छाप, घोडेस्वार छाप आणि व्याघ्र-निहंता छाप यांचा समावेश होतो. 'क्रमादित्य' हे बिरुद असणारी रेपुझे तंत्राद्वारे निर्मित सुवर्ण नाणी ही स्कंदगुप्ताने काढली असावीत, असे अभ्यासकांचे मत आहे. रजत नाण्यांमध्ये गरुड छाप, मध्यदेश छाप, वृषभ

छाप, वेदी छाप आणि त्रिशूळसहित वृषभ छाप यांचा समावेश होतो. शिशाच्या नाण्यांत गरुड छाप, महाशक्तीसह कुक्कुट छाप आणि महाशक्तीसह नंदी छाप यांचा समावेश होतो.स्कंदगुप्तानंतर राज्य करणाऱ्या बहुतांश राजांनी धनुर्धर छाप या प्रकारातील सुवर्ण नाणी काढली. तृतीय चंद्रगुप्ताने काढलेली धनुर्धर छाप आणि घोडेस्वार छाप या प्रकारची नाणी अलीकडे अभ्यासकांनी प्रकाशित केली आहेत. प्रथम नरसिंहगुप्त, द्वितीय कुमारगुप्त आणि बुधगुप्त यांनी धनुर्धर छाप या प्रकारातील सुवर्ण नाणी प्रचलनात आणली. बुधगुप्ताने मध्यदेश छाप या प्रकारची रजत नाणीही काढली. वैन्यगुप्त, द्वितीय नरसिंहगुप्त आणि विष्णुगुप्त या राजांनी धनुर्धर छाप या प्रकारची सुवर्ण नाणी प्रचलनात आणली.

**गोषवारा :**

नाण्यांवरील मजकुरावरून राजा, भाषा आणि लिपी आपल्याला समजून येते. असे जवळपास ४० परकीय राजे निव्वळ नाण्यांवरून आपल्याला कळले आहेत. या राजांचा निव्वल उल्लेख करणारेही अन्य कोणतेही लिखित साधन उपलब्ध नाही . नाण्यांवरील राजांनी तिथी लिहिण्यास सुरुवात केली. यामुळे आपल्याला कालक्रम समजण्यात मदत होते. नाण्यांच्या उपलब्धीवरून, तत्कालिन राजवटीमधील व्यापारी संबंध तसेच व्यापारी जाळे इ. बाबी कळून येतात. (राज्यविस्तार मात्र कळत नाही. कारण, नाणी एका ठिकाणाहून दुसरीकडे आरामात नेता येतात. असा राज्यविस्तार अन्य साधनांतून कळतो) नाण्यांतील धातूच्या प्रमाणावरून आर्थिक परिस्थिती कळून येते. जसे, गुप्तांच्या नाणेसंचामध्ये सोन्याचे मोठे प्रमाण त्याच्या काळातील समृद्धी दाखवते. नाण्यांवरून राजाचा धार्मिक कल दिसून येतो. जसे गुप्तांच्या नाण्यांच्या पुढील बाजूस गरुडध्वज तर मागील बाजूस लक्ष्मी आहे म्हणजे ते वैष्णव असावेत असे कळते. नाण्यांवरील देवतांवरून राजाचे धार्मिक धोरणही समजते. जर नाणी, पुरातत्वीय उत्खननातील स्तरामध्ये सापडली तर त्यावरून त्या स्तरांचा कालनिर्णय होतो. यातून त्या स्तरातील अन्य अवशेषांचे कालमापन होते.

**संदर्भ :**


१. इतिहास लेखनशास्त्र -डॉ. बी. एन. सरदेसाई ,पृ.५२
२. एम. के. ढवळीकर - प्राचीन भारतीय नाणकशास्त्र पुणे, २०१३,पृ.१,३
३. गुप्त, परमेश्वरीलाल, भारत के पूर्व-कालिक सिक्के, वाराणसी, १९९,पृ.३५
४. Altekar, AnantSadashiv, the Coinage of the Gupta Empire and Its Imitations, Varanasi, 1957, p. 57